# बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्र. सआ/आर/उ/ 53 /अति.निर्मु. दि.04. 09.2018**

विषय :– आर/उत्तर विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगारांची नेमणूक करण्याच्या कामासाठी अशासकीय संस्थांची निवड करण्याकरिता म.न.पा.च्या संकेत स्थळावर जाहिरात प्रदर्शित करणेबाबत.

संदर्भ :- उपायुक्त (परि-7) यांची दि. 13.08.2018 रोजी DMC Z-VII/5451/W या अन्वये मंजुरी.

उपरोक्त संदर्भित विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आर/उत्तर विभागातील अनुज्ञापन खात्यात अतिक्रमण निर्मुलन विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगारांची नेमणूक करावयाची आहे. यासाठी सदर कामासाठी अशासकीय संस्थांची निवड करण्याबाबतची जाहीर सुचना म.न.पा. संकेत स्थळावर प्रदर्शित करावयाची आहे.

सदर जाहिर सुचना कृपया म.न.पा. संकेत स्थळावर दि.07/09/18 ते दि. 14/09/18 या कालावधीमध्ये प्रदर्शित करण्यात यावी. सोबत जाहिर सुचनेची प्रत जोडण्यात आलेली आहे.

**सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग**

**ए.बी.एम.पीएमओ (सॅप प्रोजेक्ट)**

c-17

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**जाहिर सुचना**

विषय :- आर/उत्तर विभागाकरिता अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरीता कंत्राटी कामगार अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सुचना.

सदर सुचनेद्वारे नोंदणीकृत सर्व अशासकिय संस्थांना कळविण्यात येते की, 'आर/उत्तर' विभागातील अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करणेकामी खालील अटीनुसार कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत इच्छुक अशासकिय संस्थांनी (एन.जी.ओ.) सहा. आयुक्त, 'आर/उत्तर' विभाग याचे कार्यालय, सगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली,जयवत सावत मार्ग,दहिसर (पश्चिम), मुंबई - ४०००६८ यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या संस्थांनी खालील नमूद आवश्यक कागदपत्रांसहित दिनांक 14/09/18 रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत सिलबंद अर्ज अनुज्ञापन खाते, 'आर/उत्तर' विभाग, रुम न.- १९ येथे सिलबंद पेटीत टाकावे.

अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) संस्थांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कामासाठी फक्त 'आर/उत्तर' विभागातील स्थानिक अशासकिय संस्थांनी अर्ज करावेत.

२. दिनांक ०१.०८.२०१८ ते ३१.०१.२०१९ हया कालावधीकरीता किवा कार्यादेशाच्या दिनाकापासून (जे नतर असेल) त्या आवश्यकतेनुसार कामगार पुरविणे.

३. प्रतिदिन प्रती कामगार रु. 576.92/- प्रतिदिन प्रति कामगार इतके वेतन + ४६% लेव्हीचे अधिदान परिपत्रक क्र.प्रकाअ/14, दि. १३.०३.२०१८ च्या अटींच्या पूर्ततेनंतर (प्रतिपूर्ती स्वरुपात) करण्यात येईल.

४. 'आर/उत्तर' विभागातील अधिका-यांच्या सुचनेनुसार रोजच्या कामाकरीता मागणी केल्याप्रमाणे (सकाळ/दुपार सत्रात) सुरळीतपणे विनाविलंब, सक्षम कामगारांचा पुरवठा करणे. सदर अटीचा भंग झाल्यास प्रपत्र 'ब' प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५. पुरवठा केलेल्या कामगारांच्या देयकाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिक्षणानंतर विभागीय लेखा सकेताक २२०८००४०० या लेखाशिर्षातून संबंधित संस्थेला ई.सी.एस./एन.ई.एफ.टी. द्वारे अधिदान केले जाईल.

६. संस्थेने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या कामगारांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत दरमहा वेतनाचे अधिदान आरटीजीएस/एनईएफटी द्वारे करणे बंधनकारक राहिल. तसे न केल्यास संस्थेचे काम रद्द करुन संस्था काळया यादीत टाकण्यात येईल. महानगरपालिकेकडून आरटीजीएस/एनईएफटी द्वारे अधिदान मिळाले नसेल तरीही कामगारांना विहित वेळेत अधिदान करणे बंधनकारक आहे. अन्यथा प्रपत्र-'ब' प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.

७. बाल कामगारांचा पुरवठा करणे निषिद्ध आहे व तसे केल्यास त्याची संपूर्णतः कायदेशीर

C-19

जबाबदारी संबंधित अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) यांचीच राहिल.

८. अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

९. उपरोक्त अटीचे पालन न करणा-या व समाधानकारकरित्या काम न करणा-या अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरीत थांबविण्याचे अधिकार सहा. आयुक्त, 'आर/उत्तर' विभाग यांना राहतील.

१०. अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन सोडत पद्धतीने पात्र अशासकिय संस्थेची निवड करण्यात येईल.

उपरोक्त निकषामध्ये न बसणा-या संस्थांना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सोडतीची तारीख दि. 25/09/18 रोजी दुपारी ०३.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

-25/9/18

सहा. आयुक्त, 'आर/उत्तर' विभाग